**महत्त्वाचे**

क्रमांक प्रशि/पो.शि.भरती/से.प्र.नि.-लेखी परीक्षा/८०/२०१७./ १७८.
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई ४०० ००१.

दिनांक :-२५/०१/२०१९.
2 5 JAN 2019

प्रति,

पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई ४०० ००१.

(लक्षवेध:- पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष.)

संदर्भ :- १) शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक सेप्रनि-१८१८/प्र.क्र.३१३/पोल-५अ, दिनांक १९.१.२०१९ व

२) शासन आदेश, गृह विभाग, क्रमांक सेप्रनि-१८१८/प्र.क्र.३१३/ पोल-५अ, दिनांक १८.१.२०१९.

३) शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक सेप्रनि-१८१८/प्र.क्र.३८०/पोल-५अ, दिनांक १९.१.२०१९ व

४) शासन आदेश, गृह विभाग, क्रमांक सेप्रनि-१८१८/प्र.क्र.३८०/ पोल-५अ, दिनांक १८.१.२०१९.

विषय :- महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष) (सेवाप्रवेश) नियम, २०१२ मध्ये सुधारणा करणेबाबत.

* * * * * *

उपरोक्त संदर्भ व विषयाबाबतच्या संदर्भाधिन, दिनांक १९.१.२०१९ चे शासन पत्र व दिनांक १८.१.२०१९ च्या आदेशांच्या प्रती सोबत सादर केल्या आहेत. सदर नमूद दिनांक १८.१.२०१८ च्या दोन्ही शासन आदेशांच्या प्रती आपल्या संकेतस्थळावर प्रसिध्द कराव्यात, अशी आपणांस विनंती आहे.

Sanjay 25/01/19

**( संजय सक्सेना )**
**अपर पोलीस महासंचालक,**
प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

Add. D.G.P. (Trg)
I.G.P. (Trg.)
Sr. O.S. (Trg.)
O.S. (Trg.)
Dated. 23 JAN 2019
Inward No. 830/2019

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक:-सेप्रनि-१८१८/प्र.क्र.३८०/पोल-५अ
गृह विभाग, मंत्रालय (मुख्य इमारत),
दुसरा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १९ जानेवारी, २०१९

प्रति,

व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
चर्नीरोड, मुंबई

**विषय :-** महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष)(सेवाप्रवेश) नियम, २०१२ मध्ये सुधारणा करणेबाबत

उपरोक्त विषयाधीन आदेशाची मराठी व इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

२. सदर आदेश शासन राजपत्र असाधारण भाग-४ ब मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या ५०० प्रती या विभागास पाठविण्यात याव्यात, ही विनंती.

(नं.ए.फोंडके)
अवर सचिव, गृह विभाग

प्रत,

१) महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक,
५) सर्व पोलीस आयुक्त,
६) सर्व पोलीस उपमहानिरीक्षक,
७) सर्व पोलीस अधीक्षक,
८) सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल
९) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) विधि व न्याय विभाग (ब शाखा), मंत्रालय, मुंबई.

**ORDER**

Home Department,
Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai - 400 032
Dated :- 18th January 2019.

Maharashtra State Reserve Police Force Act.

No. RTR-1818/C.N.380/Pol-5A. - In exercise of the powers conferred by clause (c) of sub-section (2) of section 21 of the Maharashtra State Reserve Police Force Act, (XXXVIII of 1951), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules to amend the Armed Police Constables (Male) in Maharashtra State Reserved Police Force (Recruitment) Rules, 2012, namely :-

1. These rules may be called the Armed Police Constables (Male) in Maharashtra State Reserved Police Force (Recruitment) (Amendment) Rules, 2019.
2. The rule 4 of the Maharashtra State Reserved Police Force (Recruitment) Rules, 2012, for sub-rules (1), (2) and (3), the following sub-rules, shall be substituted, namely :-

**"(1) Written Test (100 Marks):**

(A) The candidates shall first be required to appear for Written Test of 100 marks.

(B) The Written Test will include the following subjects, namely:-

(1) Arithmetic;

(2) General Knowledge and Current Affairs;

(3) Intellectual Test;

(4) Marathi Grammar.

(C) The questions asked in Written Test shall be objective type and conducted in Marathi language. The duration of Written Test will be 90 minutes.

**(2) Physical Test (100 marks)—**

The candidates securing a minimum of 35% marks (33 % marks in respect of Backward Class Category candidates) in the Written Test shall be eligible to

be called to appear for a Physical Test of 100 marks in the ratio of 1:5 of vacancies advertised in the respective catagories, as follows, namely:-

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | 5 Kilometers running | ... | ... 50 marks |
| (b) | 100 meters running | ... | ... 25 marks |
| (c) | Shot Put | ... | ... 25 marks |
| | Total | ... | ... 100 marks |

**Explanation**:- Candidates securing a minimum of 35% marks ( 33 % marks in respect of Backward Class Category candidates) in the Written Test shall be eligible to be called to appear for a Physical Test in the ratio of 1:5 of the vacancies advertised in the respective catagories. If, for example, there are 10 vacancies in the Scheduled Caste Category and 5 vacancies in the Scheduled Tribes Category, then 50 (5 X 10 = 50) candidates will be listed on merit in the Scheduled Caste Category and 25 (5 X 5=25) candidates, will be listed in the Scheduled Tribes category. However, all candidates in the Scheduled Caste Category who have secured the same marks as the Scheduled Caste candidate at the 50th rank shall be eligible to be called to appear for a Physical Test. Similarly, all Scheduled Tribes Category candidates who have secured the same marks as the Scheduled Tribes candidate ranking 25th will be eligible to be called to appear for a Physical Test.

**(3)** The Selection Board constituted by the Director General shall prepare a merit list from amongs the candidates based on the results of the two criteria enumerated at the sub- rules (1) and (2) of this rule. After amalgamation of marks obtained in Written Test and Physical Test, the final merit list shall be prepared as per steps mentioned in the Genral Administration Department's Governments Resolution No. SRV-1097/CR-31/98/16A, dated 16th March 1999 and any subsequent orders issued by Government, from time to time."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

(V. M. Bhat)
Deputy Secretary to Government.

# आदेश

गृह विभाग,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १८ जानेवारी, २०१९

महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बल अधिनियम.

क्रमांक सेप्रनि-१८१८/प्र.क्र.३८०/पोल-५अ, महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बल अधिनियम (१९५१ चा ३८) च्या कलम-२१ (२) (क) आणि त्यानुषंगाने प्रदान करण्यात आलेल्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र राज्यातील गृह विभागाच्या अखत्यारीतील पोलीस दलातील "महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष)(सेवाप्रवेश) नियम, २०१२ सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे :-

१. या नियमांना "महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश)(सुधारणा) नियम, २०१९" असे संबोधण्यात यावे.

२. "महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश)(पुरुष) नियम, २०१२ मधील नियम ४ चे उपखंड (१), (२) आणि (३) खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहेत :-

**"(१) लेखी परीक्षा (१०० गुण) :-**

(अ) सशस्त्र पोलीस शिपाई पदासाठी उमेदवारांची प्रथम लेखी परीक्षा घेण्यात येईल. सदरहू परीक्षा १०० गुणांची असेल.

(ब) लेखी चाचणीमध्ये खालील विषयांचा समावेश असेल :-

१) अंकगणित ;

२) सामान्य ज्ञान व चालू घडामोडी ;

३) बुध्दीमत्ता चाचणी ;

४) मराठी व्याकरण.

(क) लेखी चाचणीचा कालावधी ९० मिनिटांचा असेल व लेखी चाचणी मराठी भाषेत घेण्यात येईल. सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरुपाची राहतील.

**(२) शारीरीक चाचणी (१०० गुण)** :- जे उमेदवार लेखी परीक्षेत किमान ३५% (मागास प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत ३३%) गुण मिळवून उत्तीर्ण होतील, त्यांच्यापैकी गुणवत्ता क्रमानुसार, प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या पदसंख्येच्या १ : ५ या प्रमाणात प्रवर्गनिहाय उमेदवारांना खालीलप्रमाणे शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | ५ कि.मी. धावणे | ...... | ५० गुण |
| (ब) | १०० मीटर धावणे | ...... | २५ गुण |
| (क) | गोळा फेक | ...... | २५ गुण |
| | एकूण | ...... | १०० गुण |

<u>स्पष्टीकरण</u> :- जे उमेदवार लेखी चाचणीत किमान ३५% (मागास प्रवर्गातील उमेदवाराबाबत ३३%) गुण मिळवून लेखी परीक्षा उत्तीर्ण होतील, त्यांच्यापैकी गुणवत्ता क्रमानुसार प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या पदसंख्येच्या १ : ५ या प्रमाणात प्रवर्गनिहाय उमेदवारांना शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल. उदाहरणार्थ जर अनुसूचित जाती प्रवर्गासाठी १० जागा व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी ५ जागा असतील तर अनुसूचित जाती प्रवर्गातील ५०(५X१०=५०) व अनुसूचित जमाती प्रवर्गातील २५(५X५=२५) उमेदवार शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरतील. तथापि, अनुसूचित जाती प्रवर्गातील गुणानुक्रमे ५० व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांना मिळालेले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित जाती प्रवर्गांतर्गत शारिरीक चाचणीसाठी पात्र असतील. तसेच, अनुसूचित जमाती प्रवर्गातील गुणानुक्रमे २५ व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढ्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांना मिळालेले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित जमाती प्रवर्गांतर्गत शारिरीक चाचणीसाठी पात्र असतील.

**(३)** महासंचालकांनी प्रत्येक पोलीस घटकांसाठी गठीत केलेले निवड मंडळ या नियमाच्या पोटनियम (१) व (२) मध्ये नमुद केलेल्या दोन निकषांवरुन प्राप्त एकत्रित गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करील. लेखी परीक्षा व शारीरिक चाचणी यामध्ये प्राप्त होणारे गुण एकत्र केल्यानंतर, उमेदवारांची अंतिम गुणवत्ता यादी सामान्य प्रशासन विभागाच्या

क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दिनांक १६ मार्च १९९९ च्या शासन परिपत्रकामध्ये दिलेल्या टप्प्यानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार तयार करण्यात येईल."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नावाने,

(व्यं.मा.भट)
शासनाचे उप सचिव.

Add. D.G.P. (Trg )
I.G.P. (Trg.)
Sr. O.S. (Trg.)
O.S. (Trg.)
Dated. 23 JAN 2019
Inward No. 829/2019

**महाराष्ट्र शासन**

क्रमांकः-सेप्रनि-१८१८/प्र.क्र.३१३/पोल-५अ
गृह विभाग, मंत्रालय (मुख्य इमारत),
दुसरा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १९ जानेवारी, २०१९

प्रति,

व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
चर्नीरोड, मुंबई

**विषय :-** महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मध्ये सुधारणा करणेबाबत

उपरोक्त विषयाधीन आदेशाची मराठी व इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

२. सदर आदेश शासन राजपत्र असाधारण भाग-४ ब मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या ५०० प्रती या विभागास पाठविण्यात याव्यात, ही विनंती.

(न.ए.फोंडके)
अवर सचिव, गृह विभाग

प्रत,

१) महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक,
४) सर्व पोलीस आयुक्त,
५) सर्व पोलीस उपमहानिरीक्षक,
६) सर्व पोलीस अधीक्षक,
७) सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल
८) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) विधि व न्याय विभाग (ब शाखा), मंत्रालय, मुंबई.

**ORDER**

Home Department,
Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai - 400 032
Dated :- 18th January 2019.

Maharashtra Police Act.

No.RCT-1818/CR-313/pol-5A. - In exercise of the powers conferred by clause (b) of section 5 of the Maharashtra Police Act (XXII of 1951), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules futher to amend the Maharashtra Police Constables (Recruitment) Rules, 2011, namely :-

1. These rules may be called the Maharashtra Police Constables (Recruitment) (Amendment) Rules, 2019.
2. In rule 4 of the Maharashtra Police Constables (Recruitment) Rules, 2011, for sub-rules (1), (2) and (3), the following sub-rules shall be substituted, namely :-

**"(1) Written Test (100 Marks):**

(A) The candidates shall first be required to appear for Written Test of 100 marks.

(B) The Written Test will include the following subjects, namely:-

(1) Arithmetic;

(2) General Knowledge and Current Affairs;

(3) Intellectual Test;

(4) Marathi Grammar.

(C) The questions asked in written test shall be objective type and conducted in Marathi language. The duration of Written Test will be 90 minutes.

**(2) Physical Test (50 marks)—**

The candidates securing a minimum of 35% marks (33 % marks in respect of Backward Class Category candidates) in the Written Test shall be eligible to be called to appear for a Physical Test in the ratio of 1:5 of vacancies advertised in the respective catagories. The physical test will be of a total 50 marks as follows, namely:-

**(A) Male Candidates :**

| | | |
|---|---|---|
| (A) | 1600 Meters Running | 30 Marks |
| (B) | 100 Meters Running | 10 Marks |
| (C) | Shot Put | 10 Marks |
| | *Total Marks* | *50Marks* |

**(B) Female Candidates :**

| | | |
|---|---|---|
| (A) | 800 Meters Running | 30 Marks |
| (B) | 100 Meters Running | 10 Marks |
| (C) | Shot Put | 10 Marks |
| | *Total Marks* | *50Marks* |

**Explanation** :- Candidates securing a minimum of 35% marks ( 33 % marks in respect of Backward Class category candidates) in the Written Test shall be eligible to be called to appear for a Physical Test in the ratio of 1:5 of the vacancies advertised in the respective catagories. If, for example, there are 10 vacancies in the Scheduled Caste category and 5 vacancies in the Scheduled Tribes category, then 50 (5 X 10 = 50) candidates will be listed on merit in the Scheduled Caste Category and 25 (5 X 5=25) candidates, will be listed in the Scheduled Tribes category. However, all candidates in the Scheduled Caste category who have secured the same marks as the Scheduled Caste candidate at the 50th rank shall be eligible to be called to appear for a Physical Test. Similarly, all Scheduled Tribes Category Candidates who have secured the same marks as the Scheduled Tribes candidate ranking 25th will be eligible to be called to appear for a Physical Test.

**(3)** The Selection Board constituted by the Director General shall prepare a merit list from amongst the candidates based on the results of the two criteria enumerated at the sub- rules (1) and (2) of this rule. After amalgamation of marks obtained in Written Test and Physical Test, the final merit list shall be prepared as per steps mentioned in the Genral Administration Department's Governments Resolution No. SRV-1097/CR-31/98/16A, dated 16th March 1999 and any subsequent orders issued by Government, from time to time."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

(V. M. Bhat)
Deputy Secretary to Government.

# आदेश

गृह विभाग,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १८ जानेवारी, २०१९

महाराष्ट्र पोलीस अधिनियम.

क्रमांक-सेप्रनि-१८१८/प्र.क्र.३१३/पोल-५अ, महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) च्या कलम-५ब आणि त्यानुषंगाने प्रदान करण्यात आलेल्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र राज्यातील गृह विभागाच्या अखत्यारीतील पोलीस दलातील "महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मध्ये सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे :-

१. या नियमांना "महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०१९" असे संबोधण्यात यावे.

२. "महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ४ चे उपखंड (१), (२) आणि (३) खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहेत :-

"**(१) लेखी परीक्षा (१०० गुण)** :-

(अ) पोलीस शिपाई पदासाठी उमेदवारांची प्रथम लेखी परीक्षा घेण्यात येईल. सदरहू परीक्षा १०० गुणांची असेल.

(ब) लेखी परीक्षेमध्ये खालील विषयांचा समावेश असेल :-

(१) अंकगणित ;

(२) सामान्य ज्ञान व चालू घडामोडी ;

(३) बुध्दीमत्ता चाचणी ;

(४) मराठी व्याकरण.

(क) लेखी चाचणीचा कालावधी ९० मिनिटांचा असेल व लेखी चाचणी मराठी भाषेत घेण्यात येईल. सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरुपाची राहतील.

**(२) शारीरिक चाचणी (५० गुण)** :- जे उमेदवार लेखी चाचणीत किमान ३५% (मागास प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत ३३%) गुण मिळवून लेखी परीक्षा उत्तीर्ण होतील,

त्यांच्यापैकी गुणवत्ता क्रमानुसार प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या पदसंख्येच्या १ : ५ या प्रमाणात प्रवर्गनिहाय उमेदवारांना खालीलप्रमाणे शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल.

**शारीरिक चाचणी पुढीलप्रमाणे एकूण ५० गुणांची असेल :-**

**(अ) पुरुष उमेदवार :**

| | | |
|---|---|---|
| (अ) | १६०० मीटर धावणे | ३० गुण |
| (ब) | १०० मीटर धावणे | १० गुण |
| (क) | गोळा फेक | १० गुण |
| | **एकूण** | **५० गुण** |

**(ब) महिला उमेदवार :**

| | | |
|---|---|---|
| (अ) | ८०० मीटर धावणे | ३० गुण |
| (ब) | १०० मीटर धावणे | १० गुण |
| (क) | गोळा फेक | १० गुण |
| | **एकूण** | **५० गुण** |

**स्पष्टीकरण** :- जे उमेदवार लेखी चाचणीत किमान ३५% (मागास प्रवर्गातील उमेदवाराबाबत ३३%) गुण मिळवून लेखी परीक्षा उत्तीर्ण होतील, त्यांच्यापैकी गुणवत्ता क्रमानुसार प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या पदसंख्येच्या १ : ५ या प्रमाणात प्रवर्गनिहाय उमेदवारांना शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरविण्यात येईल. उदाहरणार्थ, जर अनुसूचित जाती प्रवर्गासाठी १० जागा व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी ५ जागा असतील तर अनुसूचित जाती प्रवर्गातील ५० (५X१०=५०) व अनुसूचित जमाती प्रवर्गातील २५ (५X५=२५) उमेदवार शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरतील. तथापि, अनुसूचित जाती प्रवर्गातील गुणानुक्रमे ५० व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांना मिळालेले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित जाती प्रवर्गांतर्गत शारिरीक चाचणीसाठी पात्र असतील. तसेच, अनुसूचित जमाती प्रवर्गातील गुणानुक्रमे २५ व्या क्रमांकावर असलेल्या उमेदवारास मिळालेले गुण जेवढ्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांना मिळालेले असतील ते सर्व उमेदवार अनुसूचित जमाती प्रवर्गांतर्गत शारिरीक चाचणीसाठी पात्र असतील.

(३) महासंचालकांनी प्रत्येक पोलीस घटकांसाठी गठीत केलेले निवड मंडळ या नियमाच्या पोटनियम (१) व (२) मध्ये नमुद केलेल्या दोन निकषांवरुन प्राप्त एकत्रित गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करील. लेखी परीक्षा व शारीरिक चाचणी यामध्ये प्राप्त होणारे गुण एकत्र केल्यानंतर, उमेदवारांची अंतिम गुणवत्ता यादी सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दिनांक १६ मार्च १९९९ च्या शासन परिपत्रकामध्ये दिलेल्या टप्प्यानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार तयार करण्यात येईल."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नावाने,

(व्यं.मा.भट)
शासनाचे उप सचिव.